REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 3 | DECEMBER - 2022

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत या योजनेची अंमलबजावणी संशोधनात्मक अभ्यास

जयश्री सोनकवडे
उपायुक्त, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य.

**सारांश :**

देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष झाले तरी देशभरात भटक्या विमुक्त समाजाला स्थिरता मिळाली नाही. रोजगाराच्या शोधात हा समाज अहोरात्र गावो गावी भटकत राहतो. भटक्या विमुक्तांची परवड थांबावी आणि त्यांना स्थिरता लाभावी यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुरु केली. महाराष्ट्र राज्य शासनाच्या रमाई आवास योजनेच्या धर्तीवर अथवा पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुरु केली आहे. शासन निर्णय 24 जानेवारी 2018 नुसार या योजनेची अमलबजावणी करण्यात येते.



**प्रस्तावना :**

सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्त अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गासाठी काम सुरु होते. 9 मार्च 2017 च्या राज्यपाल यांच्या अधिसुचनेनुसार इतर मागास बहुजन कल्याण विभाग हा सामाजिक न्याय विभागापासून वेगळा झाला. स्वतंत्र विभागात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमध्ये सुधारणा करुन विमुक्त जाती, भटक्या जमातीतील लाभार्थी यांची भटकती थांबावी यासाठी व त्यांना सामाजिक, अर्थिक, शैक्षणिक, वैचारीक बाबी मजबूत व्हावेत व त्यांना मुख्य प्रवाहात येता यावे यासाठी या योजनेची अंमलबजावणी सुरु केली.

विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटूंबाचे राहणीमान उंचावणे, उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना स्थिर रोजगार उपलब्ध करुन देणे हा मुख्य उददेश या योजनेचा आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर ही योजना सहायक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी यांच्या मार्फत राबविण्यात येते. 20 कुटूंबासाठी एकत्रीत वसाहत किंवा ज्या कुटूंबाकडे जागा उपलब्ध आहे त्यांना तात्काळ अर्थसहाय देवून त्यांच्या राहण्याचा प्रश्न सोडवला जातो. महाराष्ट्रात लातूर, उस्मानाबाद, चंद्रपूर, नागपूर, यवतमाळ, जालना इ. जिल्ह्यात ही योजना राबवून लाभार्थी यांना घरे बांधून देण्यात आली आहेत.

**गृहितके :**

1. विमुक्त जाती, भटक्या जमाती लाभार्थी यांना घरे बांधून देण्यात येत आहेत.
2. विमुक्त जाती, भटक्या जमातीतील लाभार्थी यांना पक्के घर मिळाले यामुळे स्थिरत्व प्राप्त झाले.
3. या योजनेचा प्रचार व प्रसार चांगला सुरु आहे.

**उद्दिष्टे :**

1. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सर्वच जिल्ह्यात जलदगतीने राबविणे बाबत चांगले प्रयत्न सुरु आहेत.
2. या योजनेमुळे कांही लाभार्थी यांना स्थिरत्व मिळाल्यामुळे त्यांचा सामाजिक व शैक्षणिक दर्जा उंचावत आहे.
3. रोजगाराच्या संधी उपलब्ध होवून अर्थिक स्त्रोत वाढले आहेत.

**पात्रता निकष :**

1. लाभार्थी हा विमुक्त जाती, भटक्या जमातीतील असावा. गावोगावी भटकती करणारा असावा.
2. वार्षिक उत्पन्न 1 लाखाच्या आत असावे.
3. लाभार्थी यांना स्वतःचे घर नसावे.
4. लाभार्थी हा भुमिहीन असावा.
5. लाभार्थी हा 6 महिने एकाच ठिकाणी वास्तव्यास असावा.
6. लाभार्थी कुटूंब हे झोपडीमध्ये, कच्चे घर, पालामध्ये राहणारे असावे.

इत्यादी अटी शर्ती पूर्ण करणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमातीतील लाभार्थी यांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेचा लाभ दिला जातो.

**प्राधान्यक्रम :**

1. प्रामुख्याने पालात राहणारे, रत्यावर राहणारे व गावोगावी भटकती करुन जगणारे जोगी, नाथजोगी, बंजारा, उसतोड कामगार इ. साठी प्राधान्य देण्यात येते.
2. दारीद्रय रेषेखाली असलेले लाभार्थी कुटूंब.
3. विधवा, परितक्त्या, अपंग महिलांना प्रथम प्राधान्य देवून कायमस्वरुपी निवारा दिला जातो.
4. पुरग्रस्त क्षेत्रातील लाभार्थी.

**योजनेच्या अटी व शर्ती :**

1. लाभार्थी यांना मिळणारा भुखंड व घर त्यावर पती पत्नीचे संयुक्तीक नावे केले जाईल.
2. विधवा, परितक्त्या, अपंग महिला यांच्या नावेच भुखंड व घर केले जाते.
3. कुटूंबातील या योजनचा एका व्यक्तीस लाभ घेता येईल.
4. प्रस्तूत घर ताबा मिळाल्यानंतर ग्रामपंचायतीची घरपटटी, पाणीपटटी भरणे आवश्यक असेल.

**तालुकास्तरीय समितीची रचना :**

1. जिल्हाधिकारी – अध्यक्ष
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद – सदस्य
3. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा – सदस्य
4. गट विकास अधिकारी, पंचायत समिती – सदस्य
5. सहायक संचालक, नगर रचना – सदस्य
6. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी – सदस्य
7. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख – सदस्य
8. संबधीत मंडळ अधिकारी – सदस्य
9. सहायक आयुक्त – सदस्य सचिव
10. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, विजाभज, इमाव, विमाप्र कल्याण यांचे कार्यालयातील समाज कल्याण निरीक्षक– सदस्य सचिव
11. सहा. आयुक्त, समाज कल्याण, सहा. संचालक, विजाभज, इमाव, विमाप्र कल्याण – सदस्य
12. उपविभगीय अधिकारी – समिती प्रमुख
13. तहसिलदार–सदस्य

14. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद – सदस्य
15. म. रा. विद्युत वितरण कंपनीचा प्रतिनिधी –सदस्य

### जिल्हास्तरीय समीती :

1. जिल्हाधिकारी – अध्यक्ष
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद–सदस्य
3. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा– सदस्य
4. म. रा. विद्यूत वितरण कंपनीचा प्रतिनिधी – सदस्य
5. सहायक संचालक, नगर रचना–सदस्य
6. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी – सदस्य
7. व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र–सदस्य
8. जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक वित्त व विकास महामंडळ–सदस्य
9. जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला विजाभज प्रवर्गासाठी कार्य करणारा सामाजिक कार्यकर्ता.
10. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण विभाग, प्रादेशिक उपसंचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय किंवा त्यांचे प्रतिनिधी
11. सहायक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी व सहायक संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय – सदस्य

### योजना अमलबजावणी कार्यपध्दती :

1. एकुण 20 कुटूंबासाठी एक हेक्टर जमीन उपलबध होत नसल्यास तेथील स्थानिक परस्थितीनुसार जमीनीची अट शिथील करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीला आहेत.
2. 10 पात्र लाभार्थी असतील तरी सदरहू योजनेचा लाभ द्यावा.
3. सदर योजनेचा निधी रमाई आवास योजनच्या धर्तीवर वैयक्तीक लाभार्थी राज्य व्यवस्थापनाच्या ग्रामीण गृह निर्माण कक्षामार्फत थेट उपलब्ध करुन देण्यात यावा.
4. योजनेचा लाभ फक्त ग्रामीण भागातच देण्यात यावा.
5. ज्या लाभार्थ्यांकडे स्वताची जागा आहे आणि आजपर्यंत त्याने केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही आवास योजनेचा लाभ घेतला नाही त्यास सदर योजनेचा लाभ देता येईल.
6. ग्रामीण भागातील प्रत्येक जिल्हयात सदरहू समाजाच्या लाभार्थ्यांना सामुहिकरित्या अथवा वैयक्तिकरित्या सदरहू योजनेचा लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

अशा प्रकारे योजनेची अमलबजावणी विमुक्त जाती, भटक्या जमातीतील लाभार्थी यांना पक्के घर देण्यासाठी वरील प्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन घरे बांधून देण्यात येतात. सहायक आयुक्त, समाज कल्याण हे सर्व जिह्यात महाराष्ट्रभर ही योजना राबवतात.

### निष्कर्ष :

1. सदरील योजनेमुळे लातूर, हिंगोली, चंद्रपूर इ. जिल्ह्यामध्ये योजना प्रभावीपणे राबवली आहे.
2. विमुक्त जाती, भटक्या जमातीतील लाभार्थी यांचे राहणीमान उंचावून अर्थिक स्त्रोत, रोजगाराच्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे.
3. या योजनेचा लाभ अनेक कुटूंबाना मिळण्यासाठी सर्वच सहायक आयुक्त यांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.
4. योजनेचा प्रसार, प्रचार अजून जोमाने करण्यात यावा.

### संदर्भ सूची :

1. शासन निर्णय 24 जानेवारी 2018
2. इतर मागास बहुजन कल्याण संचालनायातील महत्वाचे नस्ती अवलोकन

3. सहायक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून माहिती घेतली.
4. लातूर, जालना जिल्ह्यातील लाभार्थी यांच्यासोबत प्रत्यक्ष भेटी